REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १५ नोव्हेंबर, १९४४ अंक ४५

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळा उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

देना विमा कंपनी
मध्यें
तुमचा विमा उतरवा
जिंदगी ★ आग ★ मोटर
सुरेश के. देसाई, मॅनेजर.
हिंमतलाल गांधी, मॅ. डायरेक्टर.
देवकरण नानजी बिल्डिंग्ज, एल्फिन्स्टन सर्कल,
कोट, मुंबई.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
( Approved Re-treaders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.
महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना
★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स
व इतर रबरी माल तयार होतो.
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

गिरगांव
मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक,
पुणें

## विविध माहिती

### ब्रिटिश सहकारी सोसायट्या

ब्रिटिश सहकारी सोसायट्यांची किरकोळ विक्री १९४३ सालीं २३ कोटि, १५ लक्ष पौंडांची झाली. १९४२ चे मानानें हा आकडा १ कोटि, २१ लक्ष पौंडांनीं ज्यास्त आहे. सोसायट्यांच्या सभासदांत १,५७,३५० ची भर पडून त्यांची संख्या ९०,८२,२१८ झाली. भाग भांडवलांत १९४२ सालचे मानानें २ कोटि पौंडांची भर पडून तें २० कोटि पौंडांवर गेलें.

### सहकारी सप्ताहाचा समारोप

पुणें सेंट्रल को. बँकेतर्फे साजरा होणारा सहकारी सप्ताह चालू सालीं ता. २५।१०।४४ ते ३।११।४४ अखेर उत्साहानें साजरा झाला व नेहमीप्रमाणें एक आठवडाभर तज्ज्ञ व्याख्यात्यांच्या माहितीपूर्ण भाषणांचा लाभ श्रोत्यांस मिळाला. सप्ताहाचा समारोप बँकेचे चेअरमन, रा. सा. खोले ह्यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. बापुसाहेब गुप्ते ह्यांच्या हस्तें झाला. त्या दिवशीं समयोचित भाषणें झाल्यावर श्री. गुप्ते ह्यांनीं सहकारी चळवळीसंबंधीं आस्थापूर्ण विचार व्यक्त केले व निष्ठावंत कार्यकर्त्यांचा अभाव इतर चळवळीं-प्रमाणें ह्या चळवळीसहि फार तीव्रतेनें भासत आहे, असें सांगितलें.

### हिंदी लोकांचें ब्रह्मदेशांत गुंतलेलें भांडवल

ब्रह्मदेशांत तांदळाची लागवड वाढवून त्या देशास तांदळाचे निर्गत व्यापारांत महत्त्वाचें स्थान प्राप्त करून देण्यास मुख्यतः तेथें गेलेल्या मद्रास प्रांतीय चेट्टी लोकांचे परिश्रमच कारणीभूत झालेले आहेत. चेट्टी लोकांचे सुमारें ७५ कोटि रुपये ब्रह्मदेशांत गुंतलेले असावेत, असा ब्रह्मदेशच्या प्रांतिक बँकिंग कमिटीनें १९३० सालीं अंदाज केला होता. रंगून सारख्या शहरांतील घरांत व कापडाच्या व इतर दुकानांत हिंदी लोकांनीं पुष्कळ पैसा गुंतविलेला होता, तो वेगळाच. ब्रह्मदेशाची मुक्तता झाल्यानंतर, हिंदी लोकांच्या नुकसानभरपाईचा प्रश्न प्रामुख्यानें पुढें येईलच.

### सोलापूर तालुक्याचे दोन तालुके झाले

सोलापूर तालुक्याचे उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर असे दोन भाग ता. १।१०।४४ पासून करण्यांत आले आहेत. त्या दोघांच्याहि मामलेदार कचेऱ्या सोलापूर येथेंच आहेत.

### कलकत्ता शहरांत मलेरिया कां वाढला ?

कलकत्ता शहराच्या पूर्व विभागांत मलेरिया वाढला आहे, त्याचीं मुख्य कारणें (१) ब्रह्मदेशांतील निर्वासितांची गर्दी, (२) कलकत्ता सोडून गेलेल्या नागरिकांनीं परत येतांना आणलेला मलेरिया, (३) मलेरियानें पीडिलेल्या भुकी लोकांचें कलकत्त्यांत आगमन व (४) भोवतालच्या भागांतील कालव्यामधील वहातुक हीं असल्याचें कलकत्ता म्युनिसिपॅलिटीच्या आरोग्याधिकाऱ्यांनीं सांगितलें. लोकांत त्राण उरलेलें नसल्याकारणानें, मलेरियाचा प्रसार सुलभ झाला आहे, असेंहि ते म्हणाले.

### संयुक्त प्रांताची आघाडी

भाव नियंत्रणाबाबत भरण्यांत आलेले खटले व झालेल्या शिक्षा, ह्या बाबतींत सर्व प्रांतांत संयुक्त प्रांतानें आघाडी मारली आहे.

### टाटा केमिकल्स लि.

वरील कंपनीस ३० जून, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी ९३ लक्ष रुपये तोटा आला. महापुरामुळें कंपनीचें उत्पादन कार्य दोन महिने पूर्णपणें बंद होतें. मजुरांचा तुटवडा, मलेरियाचा प्रादुर्भाव, इत्यादि कारणांचीहि भर पडून सोडा अॅश प्लँट बसविण्यास विलंब लागला व सोडा अॅशचें उत्पादन फेब्रुवारीमध्यें सुरू झालें. त्यास मागणी चांगली येऊं लागली, तोंच कोळशाचा तुटवडा पडूं लागला व त्यामुळें उत्पादन मंदावलें. टाटा ऑइल मिल्स कं. लि. ला यावर्षी विक्रीच्या एजन्सीचें किमान कमिशन तिनें घेतलें नाहीं. त्या कंपनीबरोबर झालेला करार दोन वर्षांनीं वाढविण्यांत आला आहे.

### अमेरिकेंत कपाशीचें उत्पादन

अमेरिकेंत चालू मोसमामधील कपाशीच्या पिकानें उच्चांक गांठला आहे. दर एकरीं उत्पादन २९३·३ पौंड आलें आहे. एकूण उत्पादन १,२३,२०,००० गाठी होईल, असा अंदाज आहे.

### शिवसमुद्रम् येथील वीजगृह

शिवसमुद्रम् येथील वीजगृह अपघातामुळें बंद पडलें, त्यामुळें म्हैसूरमधील उद्योगधंद्यांवर किती मोठा परिणाम होईल, ह्याबद्दल भीति वाटत होती. दुरुस्ती करण्यासाठी रात्रंदिवस सुमारें एक हजार लोक झटत होते. १ जुलै १९४४ रोजीं चार यंत्रें दुरुस्त झालीं व दोन यंत्रें सुरूहि झालीं. अपघातापूर्वी, शिवसमुद्रम् व शिमोगा येथील वीजगृहांत मिळून दररोज ९३ लक्ष युनिटस वीज तयार होत असे; आतांची रोजची सरासरी ८३ लक्षांची आहे. उद्योगधंद्यांना आतां विजेचा तुटवडा भासण्याचें प्रयोजन नाहीं. अपघातामुळें कांहीं कारखाने बंद पडून थोडी बेकारी निर्माण झाली, ती अल्पकालिक ठरली व सरकारनेंहि बेकार झालेल्यांना दुसरीकडे काम देण्याची खटपट केली.

### प्रमुख देणेंकरी राष्ट्र, म्हणून फायदेशीर परिस्थिति

"युद्धसमाप्तीनंतर, ग्रेट ब्रिटन हें सबंद जगांत अग्रेसर देणेंकरी राष्ट्र होईल. ह्या परिस्थितीचा आपण पुरेपूर फायदा करून घेतला पाहिजे. ज्यांनीं आपणांस कर्जें दिलीं, त्यांस माल विकूनच आपण कर्जफेड करूं शकूं. ह्या दृष्टीनें आपण नीट कार्यक्रम आखला, तर आपली परिस्थिति भरभक्कम होईल."

—लॉर्ड डडले गॉर्डन, ह्यांचें भाषण.

### इंग्लंडमध्यें स्वस्त दुधाचा मुबलक पुरवठा

मार्च, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ग्रेट ब्रिटनमधील दुधाच्या उत्पादकांस तेथील सरकारनें ९ कोटि पौंडांची मदत केली. त्यावर्षी युद्धपूर्व वर्षापेक्षा ५ कोटि गॅलन जास्त दुधाचें उत्पादन झालें. लोक एकूण १ अब्ज गॅलन दूध प्याले; हा आकडा युद्धपूर्व सरासरीपेक्षा ३० कोटि गॅलननीं मोठा आहे. प्राथमिक शाळांत जाणाऱ्या मुलांपैकी ७९% मुलांस व वरच्या शाळांतील मुलांपैकी ६०% मुलांस दूध मिळण्याची खास व्यवस्था झालेली आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें दरमाणशीं दुधाचा खप युद्धकाळांतहि वाढला आहे व दुधाची किंमत स्थिर राखण्यांत आली आहे. "अर्थ" च्या गेल्या अंकांत, बटाट्यांचे बाबत तेथें कशी व्यवस्था झालेली आहे, हें सांगितलें होतें. त्याचप्रमाणें, गव्हाच्या रोटीस तेथें रेशनिंग नाहीं, हेंहि प्रसिद्धच आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३७० | सार्वजानिक नीतिमत्ता व कार्यक्षमता सुधारण्याची आवश्यकता–हिंदी कपाशीचें भवितव्य. | |
| २ रू. डे. बोर्डाच्या सभेंतील चर्चा ... ... | ३७१ | ८ छापखानदारांच्या कामाच्या अटी ... ... | ३७४ |
| ३ प्रो. दाणी ह्यांची निवड | ३७२ | ९ व्यभिचार व घटस्फोट | ३७४ |
| ४ प्रांतिक सहकारी परिषद् | ३७२ | १० आर्थिक पहाणी ... | ३७५ |
| ५ श्री. कागल ह्यांचा दौरा | ३७२ | ११ रोस पेशाची सुरक्षितता | ३७५ |
| ६ कै. श्री. पां. जी. केतकर | ३७२ | १२ सारस्वत बँकेची प्रगति | ३७६ |
| ७ स्फुट विचार ... | ३७३ | | |
| धान्याचें उत्पादन वाढलें, तर आतां उपासमार कां?– | | | |



# अर्थ

बुधवार, ता. १५ नोव्हेंबर, १९४४


## रूरल डेव्हलपमेंट बोर्डाच्या सभेंतील चर्चा

प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डाची सभा गेल्या आठवड्यांत मुंबई येथें भरली होती. तीमध्यें कित्येक महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार झाला. त्यांत प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं केलेल्या विशिष्ट सूचना अंतर्भूत झाल्या होत्या. मुंबई सरकारानें शेतीचा धंदा आणि शेतकरी वर्गाचें जीवन ह्यांत सुधारणा करण्याच्या हतूनें कांहीं योजना हातीं घेतल्या आहेत. उदाहरणार्थ, विजापूर जिल्ह्यांत जमिनींस बांध घालून तिची उत्पादकता वाढवण्याची मोठी योजना अंमलांत आणली जात आहे. सरकारच्या म्हणजे जनतेच्या पैशांतून असल्या कामांवर लाखो रुपये खर्चले जात असतां ज्या शेत कसणाऱ्या लोकांच्या हितासाठीं ह्या योजना अंगीकारण्यांत आल्या आहेत त्यांसच त्यांचा पूर्ण फायदा मिळावा आणि जमीनदार, सावकार वगैरेंनीं आपला खंड व व्याजाचा दर वाढवून किंवा अन्य तऱ्हेनें त्यांचा स्वतःच्या पोळीवर तूप ओतून घेण्यासाठीं उपयोग करून घेऊं नये अशी कायदेशीर व्यवस्था सरकारनें करणें अगत्याचें आहे ह्या आशयाची सुचना प्रा. गाडगीळ ह्यांनीं केली होती. संवर्धनात्मक योजनांचा साकल्यानें विचार होऊन त्यांच्या अंमलबजावणीबरोबरच त्यांचे संबंधांतील संरक्षणात्मक कायदे केले जावे आणि अशा रीतीनें योग्य निर्बंध घातले जाऊन शेतकऱ्यांच्या पदरांत सुधारणांचें फळ नीट पडेल अशी तजवीज वेळींच केली जावी असें आपलें म्हणणें त्यांनीं डेव्हलपमेंट बोर्डापुढें मांडलें. त्यांनीं सुचवलेले कायदे करण्याचे कामीं सरकारास कांहीं अडचणी भासल्या तरी सार्वजनिक पैशानें होत असलेल्या सुधारणांचा मुख्य हेतु सफल होण्यासाठीं शक्य ती खबरदारी घेण्यांत आली पाहिजे ह्या तत्वास डेव्हलपमेंट बोर्डानें मान्यता देऊन सरकारास त्याप्रमाणें शिफारस केली. जमीन सुधारणा कायद्यांत जमिनींच्या मालकांस मिळावयाच्या खंडाचे बाबतींत वरील दृष्टीनें सुचवण्यांत आलेल्या दुरुस्तीसहि बोर्डानें पाठिंबा दिला.

जिंदगीच्या वाटणीमुळें शेतांचे तुकडे उडतात आणि ते निरनिराळ्या क्षेत्रांत विभागलेहि जातात, ह्यामुळें शेतीच्या उत्पादकतेंत घट होते. शेती कायदेशीर होण्यास असल्या जमिनींच्या तुकड्यांचे मालकी हक्कास बाध न येतां एकीकरण होण्याची आवश्यकता प्रतिपादली जात आहे आणि ह्या धोरणाची अंमलबजावणी पंजाब आणि मध्यप्रांत येथें झाली आहे व होत आहे. मुंबई प्रांतांत सतरा वर्षांमागें एकत्रीकरणाविषयींच्या कायद्याचा मसुदा विधिमंडळांत मांडण्यांत आला होता. पण त्यावेळीं विशिष्ट कारणांमुळें विरोध उत्पन्न होऊन तो सरकारास मागें घ्यावा लागला होता. हा प्रश्न पुन्हां उपस्थित करण्यांत आला आहे आणि मुंबई सरकारनें त्यासंबंधांत कायद्याचा मसुदा तयार केला आहे. शेतांच्या तुकड्यांचें एकत्रीकरण त्यांच्या मालकांच्या खुशीवर अवलंबून ठेवावें का त्या बाबतींत सरकारास योग्य वाटेल तेथें सक्ती करण्याचा त्यास अधिकार असावा ह्या प्रश्नावर बोर्डाचा अभिप्राय विचारण्यांत आला असतां, ज्या गावांत एकत्रीकरणाचा कायदा अमलांत आणणें ठरेल तेथील जमीन मालकांच्या बहुमतानें ही योजना हातीं घेतली जावी, तथापि जरूर दिसेल तेथें सक्तीचीहि तरतूद कायद्यांत असावी अशा आशयाचें मत बोर्डानें व्यक्त केलें. युद्धांतून परत येणाऱ्या शिपायांस शेतीसाठीं जमिनी मिळवून देण्याविषयींच्या कायद्याचा मसुदा त्यापुढें मांडण्यांत आला होता त्याची चर्चा झाली आणि त्यांतील कित्येक कलमांत दुरुस्त्या सुचवण्यांत आल्या. त्यांपैकीं कांहीं सूचना सरकारच्यातर्फे मान्य करण्यांत आल्या आणि इतरांचा योग्य विचार होईल असें आश्वासन देण्यांत आलें.

शेतकरी कर्जनिवारण कायद्यामध्यें सुचवण्यांत आलेल्या दुरुस्त्यांची चर्चा बोर्डानें केली. प्रांतांतील सर्व भागांत ह्या कायद्याची अंमलबजावणी लवकरच चालू करण्यांत येणार असून तिच्या खालीं येणाऱ्या शेतकऱ्यांस पिकांसाठीं कर्जें दिलीं जाणें आणि त्यांच्या मालाची विक्री होणें ह्याकरितां सहकारी पतपेढ्या व विक्रीसंस्था काढण्याची तजवीज होत असल्याचें सरकारतर्फे सांगण्यांत आलें. कर्जदार शेतकऱ्यांचें कर्जफेडीचें सामर्थ्य आतां त्यांच्या जिंदगीच्या ऐंशी टक्क्यांवरून साठ टक्क्यांवर उतरण्यांत आलें आहे. कर्जाची रकम निश्चित करणाऱ्या बोर्डानें आपला त्याविषयींचा निर्णय जाहीर केला म्हणजे फेड हप्तेबंदीनें व्हावयाची असते. ह्यासंबंधांत प्रांतिक सहकारी जमीनगहाणाच्या बँकेची अशी सूचना होती कीं स्थावर जिंदगीच्या पन्नास टक्क्यांइतकी रकम सावकार घेण्यास कबूल होतील तर आपण ती रोख देण्यास तयार आहों. कर्जदार शेतकरी आणि सावकार ह्यांचा संबंध कायमचा तुटावा आणि धनकोचें देणें सहकारी बँकेनें एकदम रोखीनें फेडून शेतकऱ्यांकडून पुढें वसूली करण्याची कायदेशीर व्यवस्था डेव्हलपमेंट बोर्डास मान्य झाली. परंतु ही तजवीज सार्वत्रिक व सक्तीची होऊं नये आणि कोणत्या शेतकऱ्यांची जमीन गहाण घेऊन तिच्यावर पैसे द्यावयाचे हें ठरवणें बँकेवर सोंपवलें जावें असें तिच्या अधिकाऱ्यांचें म्हणणें पडलें. कर्जाच्या प्रकरणांची निवड करण्याची मुभा बँकेस देण्याचें तत्त्व बोर्डास मान्य न झाल्यानें हा प्रश्न अनिर्णीत राहिला. तसेंच, पिकांच्या तारणावर सोसायट्या आणि बँका कर्जें देणार त्या व्यवहारांत नुकसान आल्यास त्याचा पाच टक्केपर्यंतचा हिस्सा स्वतः सोसण्याची तयारी सरकारनें दर्शवली आहे. बँकांनींहि अल्प व्याजानें कर्जें देण्याचें कबूल केलें आहे. परंतु सरकारच्या कल्पनेपेक्षा अधिक नुकसान आल्यास तें भरून काढण्याची तयारी सरकारनें ठेवली

पाहिजे, नाहींतर सहकारी संस्थांस धक्का बसण्याची भीति आहे असें त्यास बजावण्यांत आलें. शेतीचें उत्पादन वाढवण्याचे दृष्टीनें सहकारी तत्त्वावर आणि रशियन संयुक्त पद्धतीनें ह्या धंद्याचे दुहेरी प्रयोग सरकारनें करावे ह्या सूचनेवर चर्चा झाली, तीमध्ये सहकारी संघटनेस अनुसरून प्रयत्न व्हावा आणि रशियन पद्धतीचें अनुकरण करूं नये असा बहुमताचा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला.

### प्रांतिक सहकारी परिषद

गेल्या शनिवारी आणि रविवारी मुंबई येथें सर विजयराघवाचार्य ह्यांच्या अध्यक्षतेखालीं प्रांतिक सहकारी परिषद भरून तिच्यामध्यें महत्त्वाचे अनेक विषय मान्य करण्यांत आले. प्रांताचे गव्हर्नर सर जॉन कॉलव्हिल ह्यांनीं परिषदेचें उद्घाटन केलें. त्यांनीं आपल्या भाषणांत सहकारी चळवळीविषयीं सहानुभूति व्यक्त करून परिषदेच्या सूचनांचा योग्य परामर्श घेण्याचें आश्वासन दिलें. सर जनार्दन मदन ह्यांनीं प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष ह्या नात्यानें स्वागतात्मक भाषण करतांना चळवळीचा उद्बोधक आढावा घेऊन तिच्यापुढें आलेल्या प्रश्नांचा उल्लेख केला. सर विजयराघवाचार्य ह्यांनीं आपल्या भाषणांत युद्धपरिस्थितीमुळें सहकारी चळवळीचें पाऊल कोणत्या मार्गानें पुढें पडत आहे ह्याचें विवेचन करून तिच्या उत्कर्षाची दिशा दाखवली. जमीन गहाणाच्या बँकांची स्थिति, शेतकरी कर्जनिवारणाच्या कायद्याचे परिणाम, पतपेढ्यांच्या देखरेखीची व्यवस्था, सहकारी कायद्याची दुरुस्ती, मालविक्रीची सहकारी मध्यवर्ती संस्था, दुधाचा पुरवठा, खेडेगांवी व लहान उद्योगधंदे, इत्यादि विषयांवर परिषदेनें ठराव पास केले. परिषदेंत उत्साहाचें वातावरण होतें आणि ती यशस्वी झाली ह्यांत शंका नाहीं.

### प्रो. दाणी ह्यांची नवीन डायरेक्टर म्हणून निवड

आयुर्वेद रसशाळेच्या भागीदारांची नववी वार्षिक सर्वसाधारण सभा कंपनीच्या मुख्य इमारतींत कंपनीचे अध्यक्ष, डॉ. रा. ह. भडकमकर, यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेंत डायरेक्टरांचा वृत्तांत व ३१ मे १९४४ अखेरचा हिशेब तपासनिसांनीं तपासलेला ताळेबंद व नफातोटा पत्रक मंजूर करण्यांत आलें. प्रेफरन्स शेअर होल्डरना ५ टक्के व ऑर्डिनरी शेअर होल्डरना इन्कमटॅक्ससहित ४॥ टक्के डिव्हिडंड मंजूर करण्यांत आलें. प्रो. पी. जी. दाणी बी. ए. बी. एससी. (लंडन) ह्यांना नवीन डायरेक्टर म्हणून निवडण्यांत आलें. कंपनीचा कारभार अत्यंत दक्षतेनें चालू आहे. रसशाळेची उत्तरोत्तर ह्यापेक्षां जास्त भरभराट होवो.

### टाउन प्लॅनिंग कमिटीचे सभासद, श्री. कागळ, ह्यांचा दौरा

हिंदुस्थान सरकारच्या हेल्थ सर्व्हे अॅन्ड डेव्हलपमेंट कमिटीच्या वतीनें श्री. बी. आर. कागळ हे टाउन प्लॅनिंग संबंधीं माहिती मिळविण्याकरितां सबंध हिंदुस्थानभर दौऱ्यावर आहेत. त्यांनीं ता. ५ रोजीं मराठा चेंबरला भेट दिली, त्याप्रसंगीं पुण्यांतील उद्योगधंद्यांच्या वाढीच्या दृष्टीनें येथील शहर रचनेसंबंधीं आपले विचार चेंबरच्या कार्यकारी मंडळानें त्यांचेपुढें मांडले. श्री. कागळ ह्यांनींहि विस्तृत भाषण करून टाउन प्लॅनिंगचें महत्त्व, त्यासंबंधांत परदेशांमध्यें झालेली प्रगति, जागृत लोकमताची आवश्यकता, इत्यादि गोष्टींची माहिती सांगितली. बिगर शेतकी पट्टी कशी जाचक होत आहे व त्यामुळें शहरांच्या विस्तारास अशी अडचण येत आहे, ह्याच्या तक्रारी त्यांचेपुढें मांडण्यांत आल्या, त्या वरती पोचविण्याचें त्यांनीं मान्य केलें.

## कै. श्री. पी. जी. केतकर

कळविण्यास अत्यंत खेद वाटतो कीं श्री. पी. जी. केतकर, मुंबई प्रॉ. को. बँकेचे ब्रँच अॅकौंटंट, हे तारीख ११-१०-१९४४ रोजीं अलाहाबाद येथें दिवंगत झाले. श्री. केतकर यांनीं मुंबई प्रॉ. को. बँकेंत १९२५ सालीं नोकरी पतकरली व सन १९२७ ते १९३१ पर्यंत सातारा जिल्ह्यांत काम करून सहकारी चळवळीचा पाया भरभक्कम करण्यास हातभार लावला. नंतर ३ वर्षे पश्चिम खानदेश जिल्ह्यांत ते होते. सन १९३४ मध्यें त्यांची बारामती येथें नेमणूक झाली. तेथील त्यांची प्रशांत सात वर्षांची कारकीर्द अत्यंत महत्त्वाची होती. गेल्या महायुद्धानंतर आलेल्या मंदीची झळ, जमिनी व शेतकी माल यांच्या अत्यंत उतरलेल्या किंमतीमुळें शेतकऱ्यांना अत्यंत कष्टकारक झाली होती. त्यामुळें विशेषतः पुणें जिल्ह्यांतील नीरा कॅनाल भागांतील सोसायट्यांची स्थिति फारच खालावलेली होती व त्यामुळें बँकेचें सोसायट्यांकडील येणें बरेंच थकलें व बऱ्याच सोसायट्या रद्द झाल्या. अशा चमत्कारीक व अत्यंत बिकट वेळीं त्यांची नेमणूक त्या भागांत झाली. त्यांनीं अत्यंत परिश्रम घेऊन, निरनिराळ्या योजना आखून, कर्जदार सभासदांस सूट देऊन व लांब मुदतीचे हप्ते देऊन कर्जदार व सोसायट्या यांना आपली परिस्थिति सुधारण्यास निरनिराळे मार्ग आखून दिले. ही त्यांची त्या भागांतील कामगिरी सहकारी चळवळीला पोषक अशी झाली. त्यावरून त्यांची योग्यता व सहकारी चळवळीबाबत त्यांना वाटत असलेली आस्था व्यक्त होते. ते उदार अंतःकरणाचे, विद्वान व तत्त्वनिष्ठ होते व त्यांना साहित्याची फार आवड होती.

ते १९४१ सालीं मुंबई येथें आल्यापासून दुर्दैवानें त्यांची प्रकृति ढासळली आणि कफ व क्षयरोग यांचा मिलाफ होऊन शेवटीं त्यांतच त्यांचा अंत झाला. या त्यांच्या अकाली निधनानें सहकारी चळवळीच्या व मुख्यतः मुंबई प्रॉ. को. बँकेच्या आधारस्तंभांपैकीं एक प्रमुख कार्यकर्ता गेला असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांच्या निधनानिमित्त बारामती येथील सहकारी चळवळींतील पुढाऱ्यांची व कार्यकर्त्यांची दुखवट्याची सभा तेथें भरली होती. त्याचप्रमाणें मुंबई प्रॉ. को. बँकेचे नोकर वर्गातर्फे ता. ३१।१०।४४ रोजीं बँकेचें मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वैकुंठ ल. मेहता यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरविण्यांत आली. श्री. देवधर यांनीं त्यांच्या कांहीं आठवणी सांगून आपला मौल्यवान सहकारी गेल्याबद्दल दुःख प्रदर्शित केलें व श्री. गायतोंडे यांनीं त्यांच्या अकाली निधनाबद्दल दुखवट्याचा व बँकेचा नोकरवर्ग, त्यांचें कुटुंब व इतर आप्तेष्ट यांचे दुःखांत सहभागी असल्याचा ठराव मांडला; व तो सर्वांनीं उभे राहून मंजूर केला. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो.

### ग्रेट ब्रिटनचा युद्धखर्च

युद्धास प्रारंभ झाल्यापासून पांच वर्षांत ग्रेट ब्रिटनचा एकूण युद्धखर्च २३ अब्ज, ६७ कोटि पौंड झाला. त्यापैकीं १० अब्ज, ५१ कोटि पौंड करांचे रूपानें वसूल करण्यांत आले. म्हणजे, एकूण खर्चापैकीं ४४·४% खर्च सरकारच्या उत्पन्नांतून झाला. पांचव्या वर्षांत हेंच प्रमाण ५१·४% पडलें.

# स्फुट विचार

## धान्याचें उत्पादन वाढलें, तर आतां उपासमार कां !

देशांतील अन्नपरिस्थितीवर मध्यवर्ती असेंब्लींत गेल्या आठवड्यांत चर्चा झाली. युद्धापूर्वींच्या तीन वर्षांत सरासरीनें ७ कोटि ३८ लक्ष एकरांत तांदूळ होत असे. गेल्या वर्षी लागवडीचें क्षेत्र ८ कोटि एकर एवढें झालें. सर्व प्रकारच्या धान्यांच्या लागवडीसाठीं युद्धापूर्वी १९½ कोटि एकर जमीन असे; गेल्या वर्षी ती २० कोटि, ६३ लक्ष एकर झाली. उत्पादनाचे आकडे पहातां, युद्धापूर्वीचें तांदळाचें उत्पादन २ कोटि, ६५ लक्ष टन होतें; गेल्या वर्षी तें ३ कोटि, ६ लक्ष टन भरलें. म्हणजे, जितक्या तांदळाची ब्रह्मदेशांतून आयात होत असे, त्याच्या दुपटीइतकें (४० लक्ष टन) उत्पादन वाढलें. सर्व प्रकारच्या धान्यांचें उत्पादन युद्धापूर्वी ५ कोटि, ५५ लक्ष टन होतें तें गेल्या वर्षी ६ कोटि, १० लक्ष टन भरलें. वरीलप्रमाणें लागवडीचे व उत्पादनाचे आकडे देऊन शिक्षण, आरोग्य व जमीन ह्या खात्याचे सेक्रेटरी मि. जे. डी. टायसन, ह्यांनीं "अधिक धान्य पिकवा" मोहिमेचें यश सिद्ध करण्याचा प्रयत्न मध्यवर्ती असेंब्लींत केला. युद्धापूर्वी जेवढा तांदूळ ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानांत येत असे, त्याच्या दुपटी-इतकी वाढ स्थानिक उत्पादनांत जर झाली आहे, तर नेहमी तांदूळ खाणाऱ्या प्रांतांना व जिल्ह्यांना तो कां मिळत नाहीं व देशांत लोकांची अद्यापि उपासमार कां होत आहे, असा मार्मिक प्रश्न सर कावसजी जहांगीर ह्यांनीं आपल्या भाषणांत विचारला व "खरें सांगावयाचें म्हणजे माझा ह्या आकड्यांवर विश्वास बसत नाहीं" असें त्यांनीं सांगितलें. सुमारें २० लक्ष लोक उपासमारीनें मरण पावले व ३० लक्ष लोक रोगराईस बळी पडले, ही गोष्ट नजरेआड करतां येणार नाहीं असें श्री. भुलाभाई देसाई हे म्हणाले. अन्नमंत्रि सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव ह्यांच्या मूळ सूचनेस विरोधी पक्षानें सुचविलेल्या दोन दुरुस्त्या असेंब्लीनें मंजूर केल्या.

---

## सार्वजनिक नीतिमत्ता व कार्यक्षमता सुधारण्याची आवश्यकता

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नव्या व्यापारी कॉलेजाचें "बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स" हें नांव जाहीर करण्याचा समारंभ शनिवार, ता. ११ रोजीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमुख, ह्यांच्या हस्तें झाला. त्यावेळीं प्रिन्सिपॉल कर्वे ह्यांनीं, कॉलेजच्या उद्घाटनापासूनच्या प्रगतीचा आढावा घेतला व कॉलेजला मिळालेल्या सार्वत्रिक पाठिंब्याचा उल्लेख करून बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. च्या देणगीचें वैशिष्ट्य स्पष्ट करून सांगितलें. सोसायटीच्या उत्पादकांच्या स्वार्थत्यागपूर्वक राष्ट्रीय सेवेच्या ध्येयानेंच प्रेरित झालेले सिंडिकेटचे संस्थापक व चालक हे आहेत व ही प्रथा अशीच पुढें चालू राहून समाजाच्या औद्योगिक प्रगतीस चालना मिळो, अशी इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली. सर चिंतामणराव देशमुख ह्यांचें भाषण विचार परिप्लुत व मार्गदर्शक असें झालें. कॉमर्स कॉलेजांतील शिक्षणाचें ध्येय कोणतें असावें, हें त्यांनीं विशद करून सांगितलें आणि सार्वजनिक व्यवहारांतील नीतिमत्ता व कार्यक्षमता सुधारण्याच्या आवश्यकतेवर त्यांनीं विशेष भर दिला. इतर देशांशीं हिंदुस्थानास यशस्वी स्पर्धा करावयाची असल्यास, त्यांच्याशी केवळ बरोबरी करून भागणार नाहीं, त्यांचेपेक्षा आपण सरस झालें पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानांत नैसर्गिक संपत्ति विपुल आहे, भांडवल उभारतां येईल किंवा मिळवतां येईल, लोकसंख्याहि मुबलक आहे, परंतु तिच्या घटकांचा दर्जा सुधारण्यावरच आपलें भवितव्य अवलंबून आहे, हें त्यांच्या भाषणाचें सार होतें. वैयक्तिक स्वार्थापेक्षा राष्ट्रीय हितास प्राधान्य देणारी व ध्येयासाठी कार्यक्षमतेनें परिश्रम करणारी निष्ठावंत पिढी निर्माण होणें आवश्यक आहे आणि त्यासाठीं शिक्षकवर्गानें स्वतःची शिकवण आपण स्वतः आचरणांत आणली पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें. आर्थिक व औद्योगिक क्षेत्रांत कोणत्याहि जातीचा अगर पक्षाचा जन्मसिद्ध हक्क असूं शकत नाहीं, हें सर अर्देशिर दलाल ह्यांनीं कॉलेजाच्या उद्घाटनाचे वेळीं सांगून, महाराष्ट्रीय तरुणांसहि व्यापारी क्षेत्रांत योग्य स्थान मिळण्याची शक्यता स्पष्ट केली. सर चिंतामणरावांनीं ह्या मुद्याचा उल्लेख करून, वंशावरहि हें प्रभुत्व अवलंबून नाहीं; मनूच्या काळापासून हिंदवासीयांस आर्थिक प्रगतीचें महत्त्व पटलेलें होतें; आतां आर्थिक व्यवसाय अधिक गुंतागुंतीचे व व्यापक स्वरूपाचे झाले आहेत त्यांत ज्यास्त अभ्यासपूर्वक पडावें लागतें, वगैरे गोष्टी स्पष्ट करून सांगितल्या. समारंभास आलेल्या संदेशांतील सर सकलातवाला ह्यांच्या पत्रामधील वाक्य येथें उद्धृत करण्याजोगें आहे:—"व्यापारी कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांत, व्यापारी व्यवसाय करून "नफा" मिळविण्याची वृत्ति निर्माण व्हावी; व्यापारी मंडळ्यांत राहून "सेवा" करण्याची वृत्ति निर्माण होऊं नये, अशी माझी अपेक्षा आहे."

---

## हिंदी कपाशीचें भवितव्य

अमेरिकेनें आपल्याजवळील कपाशीचा शिल्लक साठा उठविण्यासाठी त्याच्या निर्गतीस सरकारी मदत देण्याचें ठरविलें असल्याचें प्रसिद्ध झाल्यापासून, हिंदी कपाशीशी हितसंबंध असणारांत खळबळ उडाली आहे. हिंदी कपाशीची किंमत सुमारें ३३ रुपयांनीं एकदम उतरली आहे. चालू युद्धापूर्वीच्या सहा वर्षांची सरासरी पाहिली, तर हिंदी उत्पादनाच्या ५५% कपास निर्गत झालेली आहे, व ३१ ऑगस्ट, १९३९ रोजीं हिंदी शिल्लक कपास फक्त १०,६२,००० गाठी होती ती ३१ ऑगस्ट, १९४४ अखेर ४०,००,००० गाठींवर गेली आहे. अशा परिस्थितींत, अमेरिकेनें आपली कपास निर्गत करण्यासाठीं विशेष मदत करण्याचें ठरविल्यास, हिंदी कपाशीच्या निर्गतीवर त्याचा अतिशय प्रतिकूल परिणाम होणें स्वाभाविक आहे. अमेरिकेचें आर्थिक बळ एवढें मोठें आहे, कीं त्या बळाचे आधारावर परराष्ट्रीय व्यापार नियंत्रित करण्याचें त्या देशानें ठरविलें, म्हणजे हिंदुस्थानासारख्या देशास कांहींच वाव सापडणार नाहीं. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांनीं ह्यासंबंधांत एक पत्रक प्रसिद्ध करून हिंदुस्थान सरकारचें लक्ष ह्या प्रश्नाकडे वेधलें आहे.

---

## अमेरिकेनें परराष्ट्रांत गुंतविलेलें भांडवल

अमेरिकन कंपन्या व व्यक्ती ह्यांनीं परराष्ट्रांत गुंतविलेल्या रकमांची बेरीज १२ अब्ज, ३० कोटि डॉलर्स एवढी होते. त्यांपैकीं, ब्रिटिश साम्राज्यांत ५ अब्ज, ८० कोटि डॉलर्स गुंतलेले आहेत. दक्षिण अमेरिका खंडांतील देशांत गुंतलेल्या पैशाची रकम ३½ अब्ज डॉलर्स भरते. जर्मनींत सुमारें १½ अब्ज डॉलर्स अमेरिकेनें गुंतविलेले आहेत.

## छापखानदारांच्या कामाच्या अटी

### गैरसमज व भांडणें ह्यांस जागा नको

छापखानदार व छपाईचें काम करून घेणारीं गिऱ्हाइकें ह्यांचे- मध्यें अनेक वेळां गैरसमज निर्माण होऊन खटके उडतात व कित्येक प्रसंगीं निष्कारण भांडणें होतात. छापखानदार व गिऱ्हा- इक ह्या दोघांचेहि दृष्टीनें, कामाच्या संबंधांत कांहीं ठराविक नियम बंधनकारक असले तर सोईचें होईल. गिऱ्हाइकास छापखानेवा- ल्यांच्या अडचणी समजत नाहींत व जादा कामाबद्दल मोबदला देण्यास तो तयार नसतो. वेगळा मोबदला मिळणार नसल्याकार- णानें छापखानदारहि गिऱ्हाइकाच्या जादा गरजा पुऱ्या पाडण्यास नाखुष असतो. इलिनॉइज येथील छापखानदारांनीं आपल्या कामा- संबंधीं कांहीं नियम केले आहेत ते खालीं उद्धृत केले आहेत त्यांवरून ह्या विषयावर चांगला प्रकाश पडेल.

(१) गिऱ्हाइकानें दिलेली ऑर्डर, छापखानदारास व गिऱ्हाइकास ह्या दोघांसहि योग्य वाटतील अशा अटींवरच फक्त रद्द करतां येईल.

(२) स्केचेस तयार करणें, चित्रें काढणें, इत्यादि कामाबद्दल स्वतंत्र मोबदला दिला पाहिजे.

(३) चित्रें, डाइज, इत्यादींवर छापखान्याची मालकी राहील.

(४) त्यांत बदल केल्यास त्याच्या खर्चाचा वेगळा आकार पडेल.

(५) गिऱ्हाइकानें मूळ कामांत मागाहून बदल केला तर त्याबद्दल स्वतंत्र आकार पडेल.

(६) छपाईचें काम झाल्यावर टाइप मोडला जाईल. फॉर्म कांहीं दिवस राखून ठेवणें असल्यास त्याला वेगळा आकार पडेल.

(७) गिऱ्हाइकानें प्रुफें पाहून तीं दुरुस्त करून 'ठीक' असल्याचें सांगितल्यावर, त्याप्रमाणें छपाई करण्याची जबाबदारी छापखान्यावर आहे. राहून गेलेल्या चुकांची जबाबदारी छापखा- न्यावर नाहीं.

(८) प्रेस प्रुफें पहावयाचीं असल्यास, गिऱ्हाइकानें छापखा- न्यांत वेळेवर हजर राहिलें पाहिजे. विलंब लागल्यास स्वतंत्र आकार पडेल.

(९) पोस्ट कार्डे व तिकीट लावलेलीं पाकिटें ह्यांवर छपाई हवी असल्यास, तीं गिऱ्हाइकानें पुरविलीं पाहिजेत. तीं तशीं पुर- विलीं नाहींत, तर छापखाना तीं आणण्याबद्दल मूळ किंमतीवर १०% इतका जादा आकार घेईल.

(१०) तीस दिवसांपेक्षा अधिक काळ गिऱ्हाइकाचा कागद छापखान्यांत पडून राहिला, तर गिऱ्हाइकानें त्याबद्दल भाडें दिलें पाहिजे. गिऱ्हाइकानें पुरविलेला कागद छपाईस अयोग्य असेल किंवा चांगल्या तऱ्हेनें बांधलेला नसेल तर छपाईस लागणाऱ्या विलंबाबद्दल गिऱ्हाइकानें नुकसानभरपाई यावी लागेल.

(११) छपाईचें काम गिऱ्हाइकास देतांना १०% कमी अगर जास्त छपाई झाली असली तरी योग्य इतकेच कागद छापले असें समजलें जाईल.

(१२) गिऱ्हाइकानें पुरविलेल्या मालापैकीं छापखान्यांत उर- लेला माल गिऱ्हाइकाच्या खर्चानें व त्याच्या जोखमीवर साठवून ठेवला जाईल.

(१३) काम पुरें होण्यास ३० दिवसांपेक्षा जास्त काळ लागणार असल्यास, दर महिन्याच्या पहिल्या तारखेस मजुरी व माल ह्यांच्या किंमतीच्या ७५% इतक्या रकमेचें बिल केलें जाईल व काम पुरें केलें म्हणजे उरलेल्या सर्व रकमेचें बिल करण्यांत येईल.

(१४) तीस दिवसांत बिलाचे पैसे दिले पाहिजेत. छपाईचें काम मिळाल्यापासून पांच दिवसांचे आंत गिऱ्हाइकानें तक्रार असल्यास कळविली पाहिजे.

(१५) कराराच्या दिवसानंतर छापखानदाराचे अधिकारा- बाहेरील परिस्थितीमुळें कामाचा खर्च कमी अधिक झाल्यास, बिल त्याप्रमाणें केलें जाईल.

(१६) वरील अटी मान्य आहेत असें समजूनच काम स्वीका- रलें जाईल. अटींत बदल करून हवा असल्यास, उभयपक्षानें त्याप्रमाणें लेखी कागद केला पाहिजे.

---

### व्यभिचार सिद्ध झाला तरी घटस्फोट नाहीं

मुंबई हायकोर्टांत सन १९२६ च्या 'इंडियन अँड कलोनि- अल डायव्होर्स ज्युरिसडिक्शन ॲक्ट' खालील पुढीलप्रमाणें केस निकालासाठी आली होती. अर्जदार हे एक स्कॉटिश गृहस्थ होते; त्यांनीं जाब देणार बाईशीं सन १९३० मध्यें रंगून येथें लग्न लावलें; त्यानंतर सप्टेंबर १९४१ मध्यें ब्रह्मदेश जपानच्या ताब्यांत गेला त्यावेळीं जे लोक इकडे निघून आले त्यांत हें जोडपेंही निघून आलें; परंतु प्रत्येकजण स्वतंत्र रीतीनें आला. कारण त्याच सुमा- रास हे वेगवेगळे राहात होते. अर्जदार वादींचें असें म्हणणें होतें कीं त्याची बायको हिचा मुंबईत एका लष्करी अधिकाऱ्याशीं अनैतिक संबंध असल्यानें त्याला त्याचे बायकोपासुन सोडचिठ्ठी मिळावी; मुंबई हायकोर्टास या बाबतींत कायद्याप्रमाणें दाद देतां येते कीं नाहीं असा प्राथमिक मुद्दा निघाल्यावरून त्या मुद्यावरच सदरचा अर्ज फेटाळला गेला. वर नमूद केलेल्या काय- द्याप्रमाणें लग्न रद्दबातल ठरवावयाचें असल्यास असें लग्न हिंदु- स्थानांत झालें असलें पाहिजे व ब्रह्मदेश हा १९३५ च्या घटना- कायद्याप्रमाणें हिंदुस्थानापासून विभक्त झाला असल्यानें रंगूनला लागलेलें लग्न हिंदुस्थानांत लागलें असें म्हणतां येणार नाहीं. सद- रच्या कायद्याप्रमाणें नुसता व्यभिचार हिंदुस्थानांत झाला एवढ्या- वरून विवाह रद्द होण्याची दाद मिळणार नाहीं, तर ते हिंदुस्थानांत एकत्र राहिले होते असें सिद्ध होऊन व्यभिचार सिद्ध झाला तरच मुंबई हायकोर्टाला अर्जदार यास दाद देण्याचा अधिकार प्राप्त होईल.

---

### दि पूना फार्मर्स लि.

डेअरी, पोल्ट्री, बेकरी, शेती, व्यापार, कॅटल ब्रीडिंग, इत्यादि सर्व प्रकारचा व्यवसाय करण्यासाठीं वरील खासगी लिमिटेड कंपनी नोंदण्यांत आलेली आहे, तिचें अधिकृत भांडवल ५ लक्ष रुपये आहे. 'ब्लॉसम व्हीट फ्लेक्स'चे श्री. भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, श्री. मुरलीधर चतुर्भुज लोहिया, श्री. दलपतराम मायाशंकर दवे व 'सकाळ'चे श्री. नारायण भिकाजी परुळेकर हे कंपनीचे पहिले डायरेक्टर आहेत. कंपनीनें डेअरीचा धंदा सुरू केला अस- ल्याचें समजतें.

## शु. य. माध्यंदिन ब्राह्मणसमाजाची आर्थिक पहाणी

निरनिराळ्या समाजांच्या सर्वांगीण उन्नतीकरतां हल्लीं अनेक संस्था कार्य करीत आहेत; त्यांपैकीं पुणें येथील श्रीशुक्लयजुःशाखीय माध्यंदिन ब्राह्मणसभा ही एक संस्था होय. संस्थेतर्फे प्रतिवर्षा-प्रमाणें याज्ञवल्क्य आश्रमांत श्रीज्ञानेश्वर महाराजांचा उत्सव दिनांक ११ ते १३ नोव्हेंबर १९४४ पर्यंत साजरा करण्यांत आला; त्याला जोडून रविवार दिनांक १२ रोजीं दुपारीं ३ ते ७ पर्यंत प्रतिभा प्रेसचे रा. द. भ. ऊर्फ अण्णासाहेब लोखंडे यांचे अध्यक्षतेखालीं पुण्यांतील शाखीय व्यापारी व कारखानदार यांचें संमेलन भरवण्यांत आलें होतें; त्यावेळीं पुण्यांतील या समाजाचें 'व्यापारी क्षेत्रांतील स्थान' या विषयीं पुढीलप्रमाणें माहिती संस्थेचे चिटणीस रा. वि. त्र्यं. शेटे यांनीं सांगितली.

ब्राह्मण वर्गांतील कोणत्या एका विशिष्ट समाजानें व्यापारी पेशा पूर्वापार पत्करलेला असेल तर तो माध्यंदिन ब्राह्मण समाजानेंच होय. इ. स. १ ल्या शतकापासून पैठणच्या राजांबरोबरच तेथील माध्यंदिन सराफ-सावकारांची माहिती आपणांस मिळूं शकते. पैठण हें महाराष्ट्रांतील त्यावेळचें व्यापारीकेंद्र असल्यानें पैठणच्या पेढी-बाबतच्या धंद्यांत या समाजाचा बराच मोठा भाग होता. पूर्वी समाजांत हुंडी, सराफी व सावकारी यांची गणना व्यापारी क्षेत्रांत प्रामुख्यानें केली जात असे; साहजिकच हा धंदा करणारा माध्यंदिन समाज व्यापारी क्षेत्रांत आघाडीवर असे. आधुनिक काळीं व्यापाराचें व कारखानदारीचें क्षेत्र इतकें व्यापक झालें आहे व समाजाच्या गरजा इतक्या वाढल्या आहेत कीं त्या फक्त मारवाडी व गुजराथी समाजच बहुसंख्येनें पुरवीत आहे. माध्यंदिन ब्राह्मण समाजाची पुण्यांतील कुटुंब संख्या २,००० सरासरीनें आहे; त्यांत व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांत १२० कुटुंबें समाविष्ट होतात. त्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे:- छापखाने व प्रकाशन १०, सराफ व सावकार २०, किराणाभुसार १५, घड्याळांचे व्यापारी ५, स्टेशनरी ५, सायकलींचे दुकानदार ५, मोटारचे व्यापारी ४, शिंपीकाम करणारे ९, पेंटर्स ५, औषधी-सामानांचे व्यापारी २, निरनिराळ्या मालांचे कारखानदार १२, कापडव्यापारी ६, सिनेमा २, व इतर किरकोळ व्यापार करणारे १८. यांतील बहुसंख्य लोक मालाची वाटणी करणारे दुकानदार आहेत; उत्पादक मालाचे कारखानदार २।३ जण फक्त आहेत. समाजांतील प्रमुख औद्योगिक कार्यकर्त्यांत रबरी मालाचे कारखान-दार श्री. कृ. म. जंगली, छापखानावाले व प्रकाशक श्री. द. म. लोखंडे व दे. श्री. जोशी, मशीन टूल्स करणारे श्री. मो. ग. जोशी, डेक्कन एजन्सीजचे श्री. दि. द. देशपांडे, व्यापारी श्री. दास्ताने, पुस्तक प्रकाशक श्री. कापर्डेकर व सिनेमा उद्योगांतील पाठकबंधु व श्री. गं. न. पाठक यांचा उल्लेख करतां येईल. इतर दृष्टीनें समाजाची पाहणी केली तर बहुसंख्य तरुण लोक नोकरी पेशाकडे किंवा शिक्षक, डॉक्टर, वकील, इंजीनिअर या व्यवसायांकडेच सह-जासहजीं वळलेले दिसून येतात. त्यामुळें पुणें शहराच्या नव्या पद्धतीच्या संघटनात्मक औद्योगिक व व्यावसायिक जीवनांत या समाजाचें जेवढें महत्त्व त्याच्या पूर्वपरंपरेला धरून दिसून यावयास पाहिजे तेवढें दिसून येत नाहीं. थोरले माधवराव पेशवे यांच्या अंतकाळच्या विनंतीला मान देऊन त्यांचें कर्ज निवारण्याकरतां तीन कोट रुपये एक रकमेनें बिनव्याज देणारे कानडे सावकार याच शहरांत या शाखेंतच जन्मले होते हें लक्षांत धरलें म्हणजे या समाजानें याहून व्यापारांत जास्त पदार्पण केलें पाहिजे हें स्पष्ट होतें.

## बँकांच्या शाखांमधील रोख पैशाची सुरक्षितता

संपादक, "अर्थ" यांस सा. न. वि. वि.

"अहो मिस्टर टोणगांवकर, तिजोरी उघडी टाकून काय पैसे मोजतां! पैसे कसे सुरक्षित ठेवावे याबद्दलचा 'अर्थ' मधील लेख वाचला नाहींत वाटतं तुम्हीं!" माझ्या सहकारी मित्रांनीं मला पैसे मोजीत असतां विचारलें.

मागच्या महिन्यापर्यंत बँकेंत 'अर्थ' येत नव्हता त्यामुळें मला नकारार्थी उत्तर द्यावें लागलें. परंतु सायंकाळीं त्यांचे घरीं तो आक्टोबर ता. २५ मधील बँकेच्या शाखांमधील रोख पैशाच्या सुरक्षितेसंबंधींचा लेख वाचतांक्षणीं मी आश्चर्यानें आइस्क्रीमच बनलों. अशा तऱ्हेनें बँकांच्या बाबतींत गैरसमज पसरेल म्हणून मी त्यांचें प्रत्येक विधान किती चुकीचें आहे तें दाखवूं इच्छितों.

पूर्वी काठीला सोनें लावून काशीपासून रामेश्वरापर्यंत जातां येत असे तरी चोरी होत नव्हती. पण हल्लीं कालाच्या गतीबरोबर समाजांतील लोकांवरील आपत्तीमुळें दानत देखील बदलत चालली आहे. परंतु असें जरी आहे तरी बँकांतील नोकर वर्ग व शिपाई देखील पूर्ण इमानी आहेत. ते तसेच पूर्वी होते, आज आहेत व पुढेंही राहतीलच.

लुटालुटीचा प्रकार एक-दोन बँकांत झाला म्हणून तो तसा सर्वत्र होईलच असें नाहीं. ज्या शाखेंत एकच मनुष्य काम करतो त्या शाखा नसून उपशाखा आहेत. शाखेंत एकापेक्षां अधिक लोक काम करीत असतात व तेथें जर असा लुटालुटीचा प्रसंगच आला तर भोंवतालचे लोक अवश्य धांवून येतील व चोरांना पकडून देतील. इतकें मात्र खरें, कीं बँकेंत काम करणाऱ्या व्यक्तींच्या लोकप्रिय-अप्रियतेवर ती मदत अवलंबून राहील.

केसरजवळ आजपर्यंत प्रतिकाराचें साधन नव्हतें व त्याची जरूरी पण भासली नाहीं. पण समजा त्याला प्रतिकाराचें साधन दिलें, तरी त्याला ऐनवेळीं त्याचा उपयोग करतां येईलच असें कोठेंच आहे!

असला प्रकार झाल्यानंतर अधिकाऱ्यांच्या व नोकरांच्या मनो-वृत्तींत जमीन अस्मानाचें अंतर राहणारच. नाहींतर शिस्त राह-णार नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं, त्यांच्या हृदयांत सहानु-भूतीचा ओलावा नाहीं.

पैशाची ने-आण करण्यासंबंधीं बँकेनें नियम केलेले नाहींत हें म्हणणें बहुतांशीं खरें असलें तरी हल्लीं हें काम बँकेंतील दोन इस-मांनीं करावें अशी पद्धत बहुतेक बँकांनीं स्वीकारली आहे.

कॅशिअरला दिलेला कौंटर सर्व ठिकाणीं बहुतेक बंदिस्तच असतो. बँकेच्या शिपायांना पैशाच्या बाबतींत शक्यतों कमी हात घालावयास रहावा, असें म्हणणें म्हणजे इमानी शिपायांबद्दल अविश्वास व अनुदारपणा दाखवणें होय.

ज्यावेळीं जाळपोळ व लुटालूट असले प्रकार होत होते त्यावेळीं ती टोळधाड एका बँकेच्या एका शाखेवर पण आली होती. परंतु बँकेंतील एकदोघांनीं सांगितलें कीं ही बँक शेतकऱ्यांची आहे. त्यावेळीं लोकांचा मोर्चा दुसरीकडे गेला. यावरून, बँकेच्यासंबंधीं जनतेंत सहानुभूति असल्यावर लुटालुटीचे प्रकार कांहीं अंशीं अवलंबून असूं शकतात, हें दिसून येईल.

बँकेच्या हिताच्या दृष्टीनें नोकर वर्गांच्या वारंवार बदल्या होत असतातच. तेव्हां अशा जनतेचा निष्कारण गैरसमज करून देऊं नये.

[illegible] टोणगांवकर.

## सारस्वत को. बँकेची प्रगति

### चेअरमन, श्री. व्ही. पी. वर्दे, ह्यांचें वार्षिक सभेंतील अध्यक्षीय भाषण

आपल्या बँकेकडील ठेवींचा आकडा १९४१-४२ अखेर १६३ लक्ष रुपये होता, तो एका वर्षापूर्वी २२३ लक्ष रुपये झाला व आतां तो सुमारें ३४ लक्ष रुपये झाला आहे. बँकेचे व्याजाचे दर व मुंबईमधील प्रमुख बँकांचे व्याजाचे दर साधारणतः सारखेच असतांनाहि ही वाढ दिसून येत आहे. एकूण ठेवींपैकी ५०% ठेवी सेव्हिंग्ज व २५% ठेवी मुदतीच्या आहेत, ह्यावरून सभासदांची सहकारी वृत्ति दिसून येते. सिल्व्हर ज्युबिली सर्टिफिकेटांस अजूनहि मागणी येत आहे व त्यांवरील व्याजाचा दर थोडा उतरला असला तरी त्यांची लोकप्रियता कायम आहे. एकूण देण्यांच्या ९४% रक्कम रोख व सरकारी रोख्यांत मिळून तरती आहे. सहकारी बँकांकडील ठेवींची मर्यादा वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांच्या आठ पटींची ठरविण्यांत आली आहे, तिचें उल्लंघन होत असल्यानें, बँकेनें ठेवी मर्यादित न केल्यास, नियमभंगामुळें होणाऱ्या नुकसानीस डायरेक्टर व्यक्तिशः जबाबदार रहातील, असें रजिस्ट्रारनें कळविलें. डायरेक्टरांनीं कांहीं ठेवी परत करून बँकेची प्रगति थांबविण्याऐवजीं व्यक्तिशः जबाबदारी पत्करण्याचें ठरविलें व नंतर बँकेचें भांडवल वाढविण्याचा व को. बँक्स असोसिएशनमार्फत आठ नंबरचा जाचक नियम बदलून घेण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. ह्या दोन्ही बाबतींत त्यांना यश आलें. भागांसाठी प्रचंड मागणी येऊन कित्येक अर्ज नाकारावे लागले. भांडवल व रिझर्व्ह ह्यांच्या बारापट ठेवी स्वीकारण्यास बँकांना दोन वर्षे सवलत मिळाली आहे, परंतु आपल्या बँकेकडे येणाऱ्या ठेवींचा ओघ इतका मोठा आहे, कीं लवकरच ही सवलत अपुरी पडूं लागेल. प्रत्येक नव्या भागापोटीं जमा झालेल्या वाढाव्याची ( २ रुपये ) रक्कम ( १५,०२८ रुपये ) रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करण्यांत आली आहे. बँक धारण करीत असलेल्या रोख्यांची बाजारभावानें किंमत पडलेल्या किंमतीपेक्षा ६८,०४० रुपयांनीं अधिक असल्याकारणानें व रिझर्व्ह फंडाखेरीज इतर फंड ठेवींची मर्यादा ठरवितांना विचारांत घेतले जात नसल्याकारणानें, इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडांतील ५० हजार रुपये रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करण्यांत आले. अहवालाचे वर्षी येणें कर्जाचा आकडा सुमारें ९५ हजारांनीं वाढून तो ४,१७,८२७ रुपये झाला आहे.

### डायरेक्टरांनीं किमान ५० भाग धारण केले पाहिजेत

" बँकेच्या व्यवस्थापक कमिटीच्या सभासदांनीं बँकेचे किमान ५० भाग धारण केलेले असले पाहिजेत, अशा अर्थाची दुरुस्ती नियमांत सुचविण्यांत येत आहे. ह्या संबंधांत भागीदारांनीं कृपा करून गैरसमज करून घेऊं नये. सहकारी रजिस्ट्रारनीं अशा अर्थाची सूचना १० वर्षांपूर्वीच केली होती. बँकेची जिंदगी ५० लाखांचे घरांत जात आहे, भांडवल ५ लाखांवर नेण्यांत येत आहे व कमिटीचे सभासद खात्याच्या नियमापेक्षा अधिक घेतल्या जाणाऱ्या ठेवींबद्दल व्यक्तिशः जबाबदार रहात आहेत, अशा परिस्थितींत 'सहकारी तत्त्वाचें उल्लंघन होत आहे' असें म्हणून कमिटीच्या सूचनेस विरोध करूं नका. कित्येक बँकांनीं अशाप्रकारें डायरेक्टरांच्या किमान लायकीची मर्यादा वाढविलेली आहे. "


* *

पूना गेस्ट हाऊस



टेलिफोन नं. ७७९

संस्थापक :

* * कै. नानासाहेब सरपोतदार

पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !

श्रीमंत कसें व्हावें ? संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देतें. वाचून लक्षाधीश व्हाल ! किं. १॥ रु. काम आणि कामिनी. काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ ! किं. १॥ रु. मृत्युलोकचा प्रवास ! मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींचें कथानक ! किं. १ रु. लिहा. विरट आणि मंडळी, कराड जि. सातारा.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

—राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

-गोल्डन कोको-

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, " गोल्डन कोको "

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें १.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.